Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 5.69
ISSN No. 2456-1665

# सामाजिक परिवर्तनाच्या लढ्याचे दीपस्तंभ - संत शिरोमणी सावता महाराज

**डॉ. राजीव आबाराव काळे**

मुळात वारकरी सांप्रदाय हा विद्रोही आहे. दांभिकपणा विरोधातील बंड आहे. अंधश्रध्दावर प्रहार करून समाजाला तात्त्विक, वैचारिक आणि वैज्ञानिक दिशा देण्याचे काम या सांप्रदायाने बाराव्या शतकापासून केले आहे. या सांप्रदायातील अग्रगण्य नाव म्हणून संत शिरोमणी सावता महाराज यांचा उल्लेख करावा लागेल. जनसामान्यांना कर्मप्रधान भक्तीने अमृतसंजिवनी प्राप्त करुन देणारे संत सावता महाराज (इ. स. 1250-1295 )वयाने, अनुभवाने व पारमार्थिक क्षेत्रातील अधिकाराने जेष्ठ होते. आजोबा दैवुमाळी, वडील परसोबापासुन संत सावता महाराजापर्यंत विठ्ठल भक्तीचे संस्कार होते. पुढे ते सुरूच राहिले. संत मालिकेतील संत सावता महाराजांचे वेगळेपण अनेक अंगाने वेगळे आहे. व्रत-वैकल्यै इ. सोडून कर्तव्य कर्माचा नवा भक्तीमार्ग जगाला संत सावता महाराजांनी दिला आहे. त्यांच्या चरित्र्याचा विश्लेषकपणाने अभ्यास केला तर त्यांच्या शिकवणीत तात्त्विक, वैचारिक व वैज्ञानिक विचार दडलेले आहेत. जे समाजालापुढे दिशादर्शक म्हणुन उभे आहेत. वारकरी संप्रदायातील संत शिरोमणी सावता महाराज अध्यात्मनिष्ठच होते. त्यांचे कार्य तर निःसंशय धार्मिक स्वरूपाचे होते, तरी देखील त्यांच्या तत्त्वनिरूपणात आणि भक्तीपर वाङ्मयात सामाजिक आशय ओतप्रोत भरून राहिला आहे. किंबहुना या सामाजिक आशयाच्या आगळेपणामुळेच वारकरी पंथाला इतकी लोकप्रियता लाभली आहे. ज्यांना सामाजिक जीवनातील जडत्त्व व अप्प्रवृत्ती नष्ट करून त्याला नवे वळण देण्याची आवश्यकता वाटली, त्यांनी आपल्या सर्व सिद्धीसाठी धार्मिक प्रबोधनाची कास धरली.

आपल्या 45 वर्षाच्या आयुष्यात अनेक सिध्दांत त्यांनी मांडले. श्रम ही पूजा आहे. हा नवा मूलमंत्र जगासमोर मांडला आणि स्वकर्तुत्वाने सिध्द करून दाखविला. Duty is Deity कर्तृत्व हाच परमेश्वर आहे. हा मानवाच्या प्रगतीचा, देशाच्या विकासाचा सत्य मार्ग सावता महाराज यांनी सांगितला. विठ्ठल भक्तीचे बाळकडु बालवयात जरी मिळाले असले तरी वडील परसोबा कडुन त्याच वयात हिशोबाचे, व्यवहाराचे शिक्षण देखील मिळाले होते हे विसरता येणार नाही. साधरणतः आठशे वर्षापूर्वी शिक्षणाची काळजी घेणारे हे कुंटुब होते. समाजातील प्रत्येक

घटकांनी शिक्षित झाले पाहिजे. हा तत्कालीन विचार आज ही समाजाला दिशा देत आहे. कदाचित हाच विचार पुढे फुले दाम्पत्याने समाजापुढे मांडला असावा. आज ही पुढारलेला म्हणुन घेणारा समाज उच्च शिक्षणापासून दूर व धुसर दिसत आहे. म्हणुनच वारकरी सांप्रदायाला अभंगवाणी देण्याची किमया संत सावता महाराज यांच्या वाणीतून घडली. तत्कालीन कुंटुबातील शिक्षणाचा फायदा म्हणुन संत सावता महाराज अभंगवाणी चे गंगोत्री ठरले. अभंगवाणी च्या माध्यमातून त्यांनी आपले विचार मांडले.

संत सावता महाराज हे एकेश्वरवादी व वैज्ञानिक संत होते. तत्कालीन पुरोहित वर्गाविरोधात त्यांनी बंड केले होते. ते भोंदुगिरीच्या विरोधात उभे राहिले. अंधश्रद्धा विरूध ते लढले. बकरे, कोंबडे यांचा बळी घेणे त्यांना मान्य नव्हते. नव्हेतर लक्ष्मीआई, मरीआई यात्रा च्या विरोधात त्यांनी जागर केला. स्वतःच्या शेतातील म्हसोबा त्यांनी फेकुन बांदावर ठेवला. ही गोष्ट जरी आपण सहजपणाने घेत असलो तरी या घटनेभोवती अनेक अर्थ दडलेले आहेत. म्होबाच्या दगडामुळे शेती पडक पडली होती. ती जागा आता सुपीक झाली. देव दगडात नाही. त्याला शेंदुर लावल्याने देव तयार होत नाही. एवढेच नाही तर समाजातील मनातील पडीकविचार सुपिक करण्यासाठी असे अंधश्रद्धेचे दगड फेकुनच द्यावे लागतील असा पुरोगामी विचार संत सावता महाराज यांनी मांडला आहे.

देव आपल्या कर्मात आहे. म्हणुन सावता महाराजांनी फळभाज्यात देव पाहिला. काही मैलावर असणारी पंढरी, साक्षात परमेश्वर जेथे वास करतो ते तीर्थक्षेत्र पंढरपूर आहे. परंतु आपले कार्य हेच पंढरपूर आणि आपण करतो ते कर्म म्हणजे पांडुरंग हा नवा विचार देऊन कर्मप्रधान भक्तीच्या जोरावर ईश्वराला आपल्याकडे येण्यास भाग पाडणारा एकमेव संत सावता महाराज आहेत. भक्ती करण्यासाठी संसाराचा त्याग करावा लागत नाही. सावता महाराज म्हणजे साधंभोळं व्यक्तीमत्व, भावुक, प्रेमळ तितकच परखड ही आहे. कर्मकांडाचा बडिवार या व्यक्तीमत्वाला मुळीच आवडला नाही. जातीपातींचा, सामाजिक विषमतचा आणि उच्चनीचत्वाचा भेदाभेद हे व्यक्तीमत्व पाळत नाही. भक्तीच्या क्षेत्रात समतेचा उदघोष करते. भक्ती केवळ संन्याशांनी आणि संसाराचा त्याग केलेल्या विरक्त जणांनी ची आहे. या विचाराला छेद देणारी भक्ती कविता संत सावता महाराज यांनी बाराव्या शतकाच्या उत्तारार्धात लिहिली. प्रपंच करता करता परमार्थ साधता येतो.

फळभाज्या -झाडपाला यांच्यावर प्रचंड प्रेम होते. शेती करतांना पाणी बचत झाले पाहिजे म्हणुन मातीची गाडगी झाडाच्या बुंध्याजवळ ठेऊन झाडाला आवश्यक पाणी दिले जात होते. त्यातूनच ठिंबक सिंचनाचा शोध मिळाला. आयुर्वेदिक औषधाचे त्यांना प्रचंड ज्ञान होते. मंत्रा-तंत्राने आजारी माणुस बरा होत नाही. ती निव्वळ अंधश्रद्धा आहे. त्यासाठी ते प्रत्येक रोग्याचा ईलाज वन औषधी देऊनच करत होते. वृक्ष लागवड करणे. तिचे संगोपन करणे. हा सावता महाराज यांचा संदेश आज ही महत्वपुर्ण आहे. कारण निसर्गाला गरीब करून मानवाला श्रीमंत होता येणार नाही.

आमची माळ्याची जात | शेत लावु बागायत !!

हा अभंग खुप काही संदेश देऊन जातो.

आपली मुलगी नागु हिच्यावर अध्यात्मिक संसार केले. तिला व्यवहाराचे शिक्षण दिले. मुलगी म्हणुन तीला कमी समजले नाही. मुलगा- मुलगी भेद त्यांंनी मानला नाही. आज मात्र या विषयावर जागृत होण्याची गरज आहे. तत्कालीन हे तत्त्वज्ञान आज समाजाला प्रेरक ठरले आहे. ऐहिक जीवनात कर्तव्यकर्मे करीत असतानाच काया-वाचे-मने ईश्र्वरभक्ती करता येते, हा अधिकार सर्वांना आहे. ‘न लगे सायास, न पडे संकट, नामे सोपी वाट वैकुंठाची’ असा त्यांचा रोकडा अनुभव होता. त्यांनी जनसामान्यांना आत्मोन्नतीचा मार्ग दाखविला.

आधुनिक विचार, वैज्ञानिकपणा संत सावता महाराज यांच्या चरित्र्यातून आढळतो.

नेणो योग-याग तपें | वाचे जपें विठ्ठल ||
हेंचि आमुची निजधन | सुख संपन्न विठ्ठल ||

हठयोग, यज्ञयोग किंवा जपतप या भक्तीत ते अडकले नाही. मुखाने विठ्ठल नाम आणि हाती प्रामाणिक कर्म हीच त्यांची भक्ती होती. हाच भक्तिमार्ग त्यांनी जगाला दिला आहे. आयुष्यात संकट ही ठरलेली असतात. परंतु ती पेलावी लागतात. निडरपणे त्याचा मुकाबला करावा. सकंटाने व्यक्ती सलाखुन निघतो. जीवनात कोणत्याही वेळेला, प्रसंगाला समोरच केले पाहिजे. कशाबद्दल ही तक्रार करून आयुष्यासोबत भांडण करत बसु नये.

समयासी सादर व्हावें | हा मार्ग सावता महाराज देतात. जीवनाच्या सर्वच बाबीचे ज्ञान हे संत सावता महाराज यांच्या अभंगवाणी त आहे. स्वतः योग साधना करणारे सावता महाराज योग साधनेचे महत्व समाजासमोर मांडले आहे.

संत सावता महाराज हे वैश्विक संत आहेत. त्यांचा विचार आधुनिक आहे. चंद्रभागेच्या काठावर अध्यात्मिक लोकशाही निर्माण करण्यात संत सावता महाराज यांचे मोठे योगदान ठरले आहे. आपल्या व्यवसायात ईश्वर असतो. तो व्यवसाय ते कर्म, कर्तव्य प्रामाणिक पणाने करणे हीच ईश्वरर भक्ती आहे असा जगाच्या उद्धाराचा मार्ग त्यांनी दाखविला आहे.

संदर्भ:-

१ ) संत सावता माळी चरित्र - सरस्वती बुक पुणे.